वाचले :-१) शासन निर्णय क्र.पीसीसी-३०१५/प्र.क्र.५४५/नवि-२२ दि.३० ऑगस्ट,२०१९

२) मा.आयुक्त सो. यांचेकडील दि. १३/०३/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र.माध्य/शि/०१/कावि/ ९४ /२०२४
दिनांक - १४/०३/२०२४

विषय - "प्रभारी उपशिक्षणाधिकारी" पदाचे अतिरिक्त कामकाज देणेबाबत..

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका माध्यमिक शिक्षण विभागांतर्गत मराठी व ऊर्दू माध्यमाच्या मुळ व भागशाळा असे एकूण ३४ विद्यालये कार्यरत आहेत.वाचले क्र.०१ च्या शासन निर्णयान्वये माध्यमिक शिक्षण विभागातील उप शिक्षणाधिकारी हे पद मंजूर करणेत आलेले आहे.तथापि,उप शिक्षणाधिकारी या पदाची सेवा प्रवेश नियमावली शासनाकडून मंजूर होईपर्यंत सदर पदावर मुख्याध्यापक सेवाजेष्ठतेनुसार सेवाजेष्ठ मुख्याध्यापक यांना "प्रभारी उपशिक्षणाधिकारी" या पदाचे कामकाज देणे आवश्यक आहे.

प्रभारी उपशिक्षणाधिकारी यांनी माध्यमिक शिक्षण विभागातील शिक्षकांचे रोष्टर व संच मान्यता कामकाज करणे, शिक्षकांचे सर्व प्रकारचे शासकीय वेतन अनुदान, नवीन शाळा मान्यता तसेच विद्यालयांची सर्व प्रकारच्या शिष्यवृत्या,एस.एस.सी बोर्डाकडील कामकाज विद्यालयातील कामकाजाचे वार्षीक नियोजन करणे संच मान्यता जिल्हा परिषदेकडून विहीत मुदतीत मंजुरी करून घेणे, विद्यालयातील शिक्षक कमी जास्त व तक्रारीबाबत अहवाल,विविध उपक्रमाबाबत व सर्व प्रकारे शैक्षणिक कामकाज मुख्य कार्यालयाशी समन्वय साधून करणे.विभागप्रमुख व शिक्षणाधिकारी यांनी संगितलेले ऐनवेळचे शैक्षणिक सर्व प्रकारचे कामकाज मुख्यकार्यालय व विदयालय यांच्याशी समन्वय साधून करण्यात यावे. सदरचे कामकाज हे शैक्षणिकदृष्ट्या महत्वाचे असुन विहीत वेळेत पुर्ण करणेत यावे. प्रभारी उप शिक्षणाधिकारी यांनी विद्यालयातील स्वत:चे मुख्याध्यापक या मुळ पदाचे कामकाज सांभाळून मुख्यकार्यालयाकडील व सर्व विदयालयातील प्रशासकीय कामकाज वगळून इतर शैक्षणिक कामकाज करणेत यावे.

सबब,मी अतिरिक्त आयुक्त (१),पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी,पुणे-१८.या आदेशान्वये श्री.नाडेकर बुधा काशिनाथ,मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय, निगडी यांना "प्रभारी उपशिक्षणाधिकारी" या पदाचे कामकाज आदेशाचे तारखेपासून देणेकामी मान्यता देणेत येत आहे. श्री.नाडेकर बुधा काशिनाथ यांनी प्रशासकीय कामकाज वगळून स्वत:चे मुख्याध्यापक या मुळ पदाचे कामकाज सांभाळून "प्रभारी उपशिक्षणाधिकारी" या पदाचे अतिरिक्त कामकाज करणेत यावे.

प्रस्तुत अधिकारामध्ये बदल करणे अथवा निरस्त करणे याबाबतचे हक्क मी स्वत:कडे राखून ठेवत आहे.

सही/-
(प्रदीप जांभळे पाटील)
अतिरिक्त आयुक्त (१)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८.

प्रति,

१) श्री.नाडेकर बुधा काशिनाथ,मुख्याध्यापक

प्रत,

१) मुख्याध्यापक,माध्यमिक विद्यालय, निगडी

(विजयकुमार थोरात)
सहाय्यक आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८.